# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# मंगळवार, दिनांक ०३ सप्टेंबर २०२४

## ठळक बातम्या

1. **सर्व शैक्षणिक संस्थांना मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं पुण्यात आवाहन; तर मुंबईत विधिमंडळातील संसदपटू आणि भाषणपटूंचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान.**
2. **'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेची रक्कम ई-गव्हर्नन्समुळे कमी वेळेत महिलांच्या खात्यात थेट जमा करता आली असल्याचं एकनाथ शिंदे यांचं - ईगव्हर्नन्सच्या २७व्या राष्ट्रीय परिषदेत प्रतिपादन.**
3. **विदर्भात तान्हा पोळा उत्साहात साजरा; नागपुरात ऐतिहासिक काळी पिवळी मारबत मिरवणुकीला अलोट गर्दी.**
4. **पॅरिस पॅरालिम्पिक मध्ये भारतीय खेळाडूंची यशस्वी घोडदौड सुरु; पदकांची संख्या १५ वर.**

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू-विधान परिषद

१०३ वर्षांपासून महाराष्ट्र विधी मंडळ लोकांच्या अशा आकांशा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे. या साठी सर्व सदस्यांच्या योगदानाचचं आपण कौतुक करत असल्याचे गौरव उद्गार राष्ट्रपतीं द्रौपदी मुर्मू यांनी काढले. महाराष्ट्र विधान परिषदेच्या शताब्दी सोहळ्याला संबोधित करताना त्या बोलत होत्या. सदनात आता तरुण सदस्य आपले योगदान देत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. तत्पूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दादर इथंल्या चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. वरच्या सदानाची गरज आणि महत्त्व' यावरील एका पुस्तकाचं प्रकाशन आज विधिमंडळात मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी विधिमंडळातील उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषणपटू यांचा देखील सन्मान करण्यात आला. यात विधानसभा, विधान परिषदेच्या अनेक सदस्यांचा सन्मान करण्यात आला. यांत आशिष शेलार, निरंजन

डावखरे, संजय कुटे, नीलम गोर्हे, बाळासाहेब थोरात यांचाही समावेश आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या भाषणातून विधिमंडळाच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख केला गेला तर राज्यपाल राधाकृष्णन यांनी महाराष्ट्राच्या वाटचालीत विधिमंडळाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. उद्या चार तारखेला लातूर जिल्ह्यात उदगीर इथं बुद्ध विहाराचं लोकार्पण राष्ट्रपतींच्या हस्ते होणार आहे.

राष्ट्रपती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व शैक्षणिक संस्थांना मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचं आवाहन केलं आहे. महिला आपल्या देशाच्या विकासाचा अविभाज्य भाग असल्याचं आग्रही प्रतिपादन त्यांनी केलं. पुण्यातील सिम्बॉयसिस विद्यापीठाच्या २१ व्या दीक्षांत समारंभात त्या आज बोलत होत्या. या दीक्षांत समारंभात 11 सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांपैकी 8 मुली होत्या याबद्दल कौतुक करुन त्यांनी लिंगभाव समानतेवर भर देऊन सर्वसमावेशक विकासासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांचं कौतुक केलं. मूल्याधारित शिक्षण देणं आणि विद्यार्थ्यांना समाजाची संस्कृती आणि गरजा समजावून सांगणं हे शैक्षणिक संस्थांचं ध्येय असलं पाहिजे, असं प्रतिपादन मुर्मू यांनी केलं. समाजातील वंचित घटकांना लक्षात घेऊन आरोग्य सेवा उत्पादनं विकसित करण्याचीही त्यांनी आपल्या भाषणातून सुचवलं. यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन तसंच उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

मुख्यमंत्री/ई गव्हर्नन्स

ई गव्हर्नन्स प्रणाली राबविणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असून त्यासाठी आम्ही माहिती तंत्रज्ञान धोरण सुद्धा तयार केलं आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर उद्योग, कृषी, आरोग्य या क्षेत्रात केला जाणार आहे. ई गव्हर्नन्समुळेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्याची रक्कम अतिशय कमी वेळात थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण शक्य झाल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं. ई गव्हर्नन्स विषयक २७ व्या राष्ट्रीय परिषदेचं उदघाटन आज मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. 'विकसित भारत: सुरक्षित आणि शाश्वत ई सेवा वितरण' या संकल्पनेवरील या दोन दिवसीय परिषदेत देशभरातील धोरणकर्ते, विविध राज्यातील शासकीय अधिकारी, तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. सुशासनासाठी किमान सरकार, कमाल प्रशासन हे सूत्र ई गव्हर्नन्सच्या माध्यमातून शक्य होणार असून भविष्यात

मंत्रालयातील कामं सुद्धा ई ऑफीसद्वारे होणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

लाडकी बहीण

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी राज्यातील पात्र महिलांना आता सप्टेंबर २०२४ मध्येही नोंदणी करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अशी माहिती महिला आणि  बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यापूर्वी दि.३१ ऑगस्ट पर्यंत नोंदणी करण्याची मुदत होती जी वाढवून आता सप्टेंबर २०२४ करण्यात आली आहे.

राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार

राज्य सरकारतर्फे दिल्या जाणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार आज जाहीर झाले. यावेळी विविध प्रवर्गांमधे ११० जणांची पुरस्कारांसाठी निवड झाली आहे. २०२३-२४ या वर्षासाठी ३८ प्राथमिक शिक्षकांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. तर ३९ माध्यमिक शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले आहे. आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे प्राथमिक शिक्षक एकूण आदर्श शिक्षिका ८, विशेष शिक्षक कला आणि क्रीडा दोन, दिव्यांग शिक्षक किंवा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेमधले शिक्षक एक, तर स्काऊट आणि गाईडसाठी प्रत्येकी १ अशा १०९ शिक्षकांची निवड समितीनं केली आहे. तर वर्धा जिल्हयातल्या प्राथमिक शिक्षकासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार २०२२-२३ चा पुरस्कारही यावेळी जाहीर केला आहे. पुरस्कार वितरण येत्या ५ सप्टेंबरला म्हणजे शिक्षक दिनी मुंबईत होणार आहे.

एसटी संप

राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे एस टी कर्मचाऱ्यांना वेतन, प्रलंबित महागाई भत्ता, वाढीव घरभाडे भत्ता यांसह विविध मागण्यांसाठी एसटी महामंडळाचे कर्मचारी आजपासून बेमुदत संपावर आहेत. एसटी कामगारांच्या सर्व संघटना यात सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत आहे. मात्र  सर्व

जिल्ह्यांत बाहेरगावी जाण्यासाठी एसटी स्थानकावर आलेल्या प्रवाशांची तारांबळ उडाली आहे. मात्र बुलढाणा जिल्ह्यात या संपाचा फारसा परिणाम जाणवला नाही. जिल्ह्यातील काही अगारामधून बसेस धावल्या मात्र दुपारनंतर पुन्हा आगारामधील कर्मचाऱ्यांनी संपात भाग घेतला. गोंदिया जिल्यात देखील आज बस सेवा बंद असल्या तरी दुपार नंतर बस फेऱ्या सुरु करू अशी माहिती आगार प्रमुखांनी दिली आहे. आज पोळ्याचा पाडवा म्हणजे मारबत उत्सव असल्याने दर वर्षी गोंदिया आगारात दुपारपासून बस सेवा सुरु केल्या जातात.

तान्हा पोळा-मारबत

तान्हा पोळ्याचा सण आज सर्वत्र बाळगोपाल उत्साहानं साजरा करत आहे. विविध मंदिरं, मैदानं या ठिकाणी तान्हा पोळा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होत आहे. दरम्यान तान्ह्या पोळ्याच्या दिवशी निघणारी, विदर्भाचं सांस्कृतिक वैभव असलेली नागपुरातील काळी -पिवळी मारबत मिरवणूक आज पारंपरिक पद्धतीनं निघाली. नागपुरातील या ऐतिहासिक मारबत उत्सवाला १४४ वर्षांची परंपरा लाभली आहे. मस्कासाथ इथून तऱ्हाणे तेली समाजाची पिवळी तर बारदाना मार्केट मधून काळी मारबत निघाली. या दोन्ही मिरवणुकी नेहरू पुतळा चौकात एकत्र आल्या. तर बडग्यांची मिरवणूक नागपुरातील जागनाथ बुधवारी परिसरातून निघाली. यंदा चिकनगुनिया ,डेंग्यू, रस्त्यावरील खड्डे, महिलांवरील अत्याचार आणि भ्रष्टाचारा सोबतच महागाई, वाढती बेरोजगारी या विषयांवरील बडग्यांनी नागरिकांचं लक्ष्य वेधलं. मारबतीचे अद्भूत दृश्य पाहण्यासाठी हजारो लोकांनी रस्त्यावर गर्दी केली होती. 'इडा पीडा घेऊन जा गे मारबत' म्हणत सामाजिक समस्या, रोगराई, अनिष्ट प्रथा यांचा नाश होवो अशी गाऱ्हाणी मांडत मारबत आणि बडग्यांचं विसर्जन करण्यात येतं. **गोंदिया** जिल्यात देखील 100 वर्षांपासून मारबत काढली जाते. शहराच्या विविध भागातून ५० मोठ्या मारबत मिरवणूका काढल्या जातात. **अमरावती** जिल्ह्यातील तिवसा इथं महिलांच्या बैलपोळ्याचं आयोजन करण्यात आलं असून यासाठी विविध आकर्षक बक्षिसं ठेवण्यात आली असल्याची माहिती तिवसा मतदार संघाच्या आमदार ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली. तर आमदार रवी राणा यांनी जुनी वस्ती बडनेरा,अंजनगाव बारी,भातकुली आदी भागातील गावा गावात जाऊन पोळ्याच्या उत्सवात भाग घेऊन शेतकऱ्यांच्या आनंदात सहभाग घेतला आणि पोळ्याच्या सणाच्या शुभेच्छा दिल्या.

पोळा घटना

पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर मद्यविक्री बंद असताना गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी पोलिसांनी कोलपल्ली इथं अवैध दारु विक्रेत्यांच्या घरी धाड घालून ९ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मद्यसाठा जप्त केला. याप्रकरणी तीन जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यात काल बैल धुण्यासाठी नदीवर गेलेल्या मलकापूर, देवधाबा आणि मेहकर तालुक्यातील ३ युवकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पॅरिस पॅरालिंपिक

पॅरिस पॅरालिंपिकमध्ये भारतीय खेळाडूंची यशस्वी घोडदौड सुरु असून पदकांची संख्या १५ वर पोहचली आहे. आज बॅडमिंटनमध्ये S L -४ प्रकारात एस यथिराज याने रौप्य पदक मिळवलं. तर महिलांच्या S U ५ गटात टी मुरुगेशन हिनं देखील रौप्य पदकावर नाव कोरलं. S H ६ गटात कांस्य पदकासाठी झालेल्या लढतीत भारताची नित्या सिवन विजयी झाली. मात्र F ३४ प्रकारात महिलांच्या गोळाफेक स्पर्धेत अंतिमफेरीत भाग्यश्री जाधव हिला पाचव्या क्रमांकावर समाधान मानावं लागलं. आज पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेच्या आजच्या सहाव्या दिवशी भारतीय खेळाडू नेमबाजी, तिरंदाजी, ॲथलेटिक्स या खेळांमध्ये पदकांसाठी लढत देतील. नेमबाज अवनी लेखरा आणि मोना अगरवाल या महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन S H एक प्रकारासह अन्य प्रकारांमध्ये खेळणार आहेत. तसंच, पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत T त्रेसष्ट प्रकाराच्या अंतिम फेरीत मरियप्पनथांगावेलू, शैलेशकुमार आणि शरद कुमार हे पदकांसाठी आज मैदानात उतरतील. महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत टी २० प्रकारच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

शिकार टोळीला अटक

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी/मोरगाव तालुक्यात वन्यप्राण्यांची शिकार करणाऱ्या एका टोळीला वन विभागानं अटक केली आहे. वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी खात्रीलायक टीप मिळताच धाड टाकली. यावेळी शिकार करण्याकरिता उपयोगात आणणारी लोखंडी सळई तसेच फासे मिळाले. आरोपीच्या घराची झडती घेतली असता मांस, आणि दोन बंदुका जप्त करून एकूण चार जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे.

हवामान

आज आणि उद्या संपूर्ण विदर्भात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज सकाळ पासून नागपुरात अधून-मधून ढगाळ वातावरण होतं तर सकाळी आणि दुपारच्या सुमारास पावसाच्या सरी बरसल्या. वाशिम जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. या मुळे वाशिम शहराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या एकबूर्जी धरणातील जलाशय साठा पूर्णपणे भरला आहे. सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून सांडव्यालगत असलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तर बुलढाणा जिल्ह्यात देखील अनेक नद्यांना पूर आला असून खडकपूर्णा धरणाचे सर्व १९ दरवाजे उघडण्यात आले आहे.

*****